# मेट्रो-३ : सिप्झ स्थानकाच्या

# स्लॅबचे बांधकाम पूर्ण



**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गाच्या पॅकिज ७ मधील सिप्झ स्थानकासह तीन स्थानकांच्या स्लॅबचे बांधकाम पूर्ण झाले आहे. बेस स्लॅब, कॉन्कोर्स स्लॅब, मॅझेनाईन स्लॅब आणि रूफ स्लॅब असे सर्व स्लॅबचे काम पूर्ण करण्यात आले आहे. पॅकिज ७ मधील मरोळ नाका आणि एमआयडीसी स्थानकांच्याही सर्व स्लॅबचे काम पूर्ण झाले आहे.

मरोळ नाका स्थानक, एनएटीएम अर्थात न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग मेथर्ड पद्धतीने बांधण्यात येणार असून चार प्रवेश निकासद्वार असणार आहेत. मात्र सिप्झ आणि एमआयडीसी स्थानके कट ॲण्ड कव्हर पद्धतीने बांधण्यात येणार आहेत. येथे अनुक्रमे चार आणि तीन प्रवेश निकासद्वार आहेत. सिप्झ प्रामुख्याने व्यावसायिक केंद्र मानले जाते, परंतु सध्या ते उपनगरीय रेल्वे मार्गाने जोडलेले नाही. या क्षेत्रामध्ये इलेक्ट्रॉनिक प्रादेशिक चाचणी प्रयोगशाळा, सिप्झ गाव बस स्थानक, होली स्पिरीटी रुग्णालय, आरे मिल्क कॉलनी ही महत्त्वाची स्थळे आहेत. त्यामुळे या व्यवसाय केंद्राला भेट देणाऱ्या प्रवाशांसाठी मोठी सोय होणार आहे, असे एमएमआरसीएलचे व्यवस्थापकीय संचालक रणजितसिंह देओल यांनी सांगितले आहे. या परिसरातील वाहनांच्या रहदारीमुळे एमएमआरसीएलसमोर बरीच आव्हाने उभी होती. मात्र वाहतूक पोलीस आणि एमसीजीएमच्या सहाय्याने काम सोपे झाल्याचे एमएमआरसीएलकडून सांगण्यात आले आहे. मेट्रो-३ सुरू झाल्यानंतर हे स्थानक उत्तर दक्षिण; पूर्व पश्चिम उपनगरांना जोडण्याचे काम करणार असल्याचे प्रकल्प संचालक एस. के. गुप्ता यांनी स्पष्ट केले आहे. सिप्झ स्थानकावरून नेहमी २४ हजारांहून अधिक प्रवासी प्रवास करतील, अशी अपेक्षा आहे. पॅकिज ७ मध्ये एकूण ७६ टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे.